प्रकरण - चवथे

## प्रकरण - चवथे

### ' देवाची साक्ष ' आणि ' अग्नीनफूल ' या कादंबरी संग्रहाचे स्वरुपात्मक समीक्षण

**कादंबरीची पूर्वपीठिका -**

हा आधुनिक ललित वाड:मय प्रकार आहे. गदयात्मक कथा असे तिचे वर्णन करण्यात येते. इंग्रज भारतात आल्यावर कादंबरी इथे आली. 'यमुना पर्यटन' ही बाबा पद्मनजींची पहिली कादंबरी इ.स. 1857 मध्ये लिहिली गेली. या वाड:मय प्रकाराने प्रसिध्दी व लोकप्रियता या दोन्ही बाबतीत उच्चांक गाठला आहे. त्यामुळे तिच्या स्वरुपाबद्दल उत्सुकता आहे.

काही लोक संस्कृतातून हिची उत्क्रांती मराठीत झाली असे मानतात. पण खरे पाहता इंग्रजी साहित्याच्या अनुषंगाने कांदबरी हा वाड:मय प्रकार मराठी साहित्यात आला आहे. मनुष्यप्राणी हा जन्मत:च गोष्टी वेल्हाळ आहे. आपल्या जीवनात घडलेल्या घटना, पाहिलेल्या गोष्टी किंवा ऐकलेले प्रसंग दुस-याला सांगावेत व दुस-याकडुन ऐकावेत ही त्याची जन्मजात प्रवृत्ती असते. 'उत्सुकतेपोटीच कथेचा जन्म झाला. श्रोत्यांच्या मनात 'पुढे काय'? हा प्रश्न जागृत ठेवणे हे कार्य गोष्ट करते. घटनांची कालक्रमानुसार केलेली मांडणी म्हणजे कथा. त्या घटनांना मूल्य वा अर्थ असलाच पाहिजे, असे नाही. ई.एम्.फॉस्टरच्या मते 'गोष्ट म्हणजे दुसरे तिसरे काही नसून घटनांची कालक्रमानुसार केलेली मांडणी होय'.

मनोरंजन व विद्याध्यायनाचे साधन म्हणून फार पुरातन काळापासून मानव तिच्याकडे पहात आला आहे.

मुलांना गोष्टीची आवड नैसर्गिक असते. मुलांना समजू लागते तेव्हापासून आपल्या सभोवतालच्या जगाकडे ती कुतूहलाने पाहतात व त्यातूनच त्यांची जग जाणून घेण्याची उत्सुकता जागृत होते. ' हे असे का ?' ' ते तसे का ?' 'हे असे कसे ?' इत्यादी प्रश्नांच्या जिज्ञासा पूर्तीतच कथांचे बीज जन्म घेते शंका समाधानाच्या पोटीच, कथांचा जन्म होतो. 'असं वागू नये' किंवा 'असं वागावं' या उपदेशात्मक विचारातून उपदेशात्मक कथांचा जन्म होतो. तर जिज्ञासापूर्तीतूनच

'एक होता राजा' सारख्या मनोरंजनात्मक गोष्टीची निर्मिती होते. म्हणूनच कथा हे मनोरंजनाचे साधन मानले जाते. कादंबरी हा वाङ:मय प्रकार आधुनिक असला तरी 'कथातत्वा' ची परंपरा ही जुनीच आहे. कथेचा पुरातन काळापासून मनोरंजन हा हेतू आहे. दिवसभराच्या श्रमाने थकलेला आदिमानव रात्रीच्या वेळी एकत्र येई, तेव्हा ' शिळोप्याच्या गप्पा ' होत. तेव्हा स्वतःच्या जीवनात घडलेले रहस्यमय रोमांचकारी किंवा सुखद, दुःखद प्रसंग एक दुस-यास सांगितले जात व घटकाभर मनोरंजन करुन मन हलके केले जाई. यातूनच कथेचा जन्म झाला. उत्सुकतापूर्ती व मनोरंजन यासाठी कथांचा वापर होतो. हे लक्षात येतात आपल्याकडे प्रेक्षकांचे मन वेधून घेण्यासाठी सत्य घटनांच्या जोडीला काल्पनिक घटनांची मिसळ सुरु झाली. क्रम ठरवला गेला. चुरचुरीतपणा आला. या रंजकतेतूनच कथेला कलात्मकता प्राप्त होत गेली.

कादंबरी : व्याख्या व उत्पत्ती :-

मराठी साहित्यात कादंबरी हा वाङ:मय प्रकार नवा व परकीय असला तरी 'कादंबरी' हे नांव मात्र परिचित आहे. संस्कृत साहित्यातील बाणभट्टाची कपोकल्पित कथा हिची नायिका 'कादंबरी' असून ती सर्वांच्या परिचयाची आहे.

' नॉवेल' या इंग्रजी शब्दाचा पर्यायी शब्द म्हणून प्रथमावस्थेत नवलकथा हे नाव दिले गेले खरे, पण हे नाव मागे पडले व कादंबरी हे नाव केव्हा व कसे रुढ झाले हे कळलच नाही. कादंबरी हे नाव सन 1830 च्या पूर्वी पडले असावे. कारण 1929 मध्ये प्रसिध्द झालेल्या महाराष्ट्र भाषेचा कोशात कादंबरी हा शब्द आढळतो. १

कादंबरी या शब्दाचा अर्थ 'कल्पित कथा' असा असला तरी त्याचा शब्दिक अर्थ 'कदब फुलापासून तयार केलेले गदय' असा आहे. मदिरेचे प्राशन केल्यावर मनुष्याला ज्याप्रमाणे इहलोकाचा विसर पडतो व कल्पनेच्या सुखद संसारात विहार करु लागतो. त्याचप्रमाणे कादंबरी वाचत असताना वाचक तीत इतका तन्मय होतो की, त्यास सभोवतालच्या विश्वाचा विसर पडतो. व तो कल्पनेच्या जगाचा आस्वाद होतो.

कादंबरीला व्याख्येत बांधणे म्हणजे वा-याची मोट बांधण्यासारखे आहे. आटोपशीर

व्याख्या केली तर तुटक होते व मोठी केली असता क्लिष्ट होते. कादंबरीच्या पुढील काही व्याख्या आहेत.

एम.ॲबेल चेव्हली ह्या फ्रेंच लेखकाने 'जिला काही विस्तार आहे अशी गद्य कल्पित कथा' म्हणजे कादंबरी अशी व्याख्या केली आहे.

ई.एम. फॉस्टर यांच्या मते, 'पन्नास हजार शब्दांच्या वर लिहिलेली कोणतीही काल्पनिक गद्य कथा म्हणजे कादंबरी होय'.

या व्याख्याना विस्तृत करुन न्यू इंग्लिश डिक्शनरीकार म्हणतो, 'भरपूर विस्तार असलेली मानवी जीवनातील व्यक्ती व त्यांच्या कृतीचं कथानकातून दर्शन घडविणारी काल्पनिक गद्य गोष्ट किंवा कथा' म्हणजेच कादंबरी होय.

वेब्सटरने आपल्या शब्द कोशात कादंबरीच्या विविध अंगावर प्रकाश टाकताना जी व्याख्या केली आहे ती अशी --

' विशिष्ट पध्दतीने एका मानवी समूहाचे कल्पनेने जाणलेले अनुभव शृंखलाबध्द घटनांद्वारे व्यक्त करणारी मुद्दाम शोधून लिहिलेली विस्तृत आणि गुंतागुतीची अशी कल्पित गद्य कथा म्हणजे कादंबरी होय'.

कादंबरी श्राव्य काव्य आहे. कादंबरीत पात्रांच्या भाव-भावनांचे वर्णन केले जाते. व घटना चित्रित केल्या जातात. कादंबरी ही स्वतंत्र कला आहे.

कादंबरी ही व्यक्ती करिता लिहीली जात असल्यामुळे तंत्रदृष्टया तिला विषय व अभिव्यक्तीची बंधाने नसतात. स्थळ-काल-व्यक्ती यांच्या वर्णनाला तीत भरपूर वाव असल्यामुळे लेखक तिचे लहान वा मोठे असे स्वरुप निर्धारीत करु शकतो. ती एकटयाने कोठेही व केव्हाही बसून वाचण्यासारखी असल्यामुळे तिला 'पॉकेट क्लिटर' असे मॅरियर कॉफर्डने म्हटले आहे. कादंबरीची गती स्वतंत्र व तिचे तंत्र लवचिक असते. त्यामुळे ती अधिक लोकप्रिय आहे.

कादंबरीत वर्णनांना अधिक जागा असते. कादंबरीकार निवेदन पध्दतीचा वापर करु शकतो. वर्णन व संवाद यांचाही तो वापर करुन घेतो. तसेच कादंबरीतील वर्णने शब्दरुपात असल्यामुळे वाचकाच्या कल्पनेला विशेष ताण बसत नाही. कादंबरीकार स्वतः कादंबरीत प्रत्येक गोष्ट व व्यक्तीचे वर्णन करुन सांगत असल्याने त्यातील व्यक्तीचे दर्शन संपूर्ण व सूक्ष्म असते.

कादंबरीकार हा आपल्या सृष्टीचा कर्ता व निवेदक असतो. कादंबरीचे क्षेत्र व्यापक व विशाल असते. विविध व्यक्ती व प्रसंगातून तो अनेक गोष्टींचे संस्कार घटवीत असतो. कादंबरीत त्याच्या जीवनातील विविध प्रसंग लेखक रंगवू शकतो. व्यापक जीवन दर्शन हा कादंबरीचा उद्देश असतो.

कादंबरीची गती संथ असते. कादंबरी म्हणजे कलेकलेने वाढणारा चंद्रमा व त्याचा उजळणारा प्रकाश. कादंबरीत कथानकाची गुंफण असते. कादंबरीचा विषय व्यापक असल्याने तीत अनेक व्यक्ती व घटनांच्या द्वारे विविध रसनिर्मिती करता येते. व जीवनविषयीचा व्यापक दृष्टीकोन व्यक्त करता येतो.

कादंबरी साज आहे तर कथा तिची लय होय, कथा जीवनातील एक भाव आहे तर कादंबरी जीवनाची व्याख्या होय, कादंबरीचे माध्यम गद्य असते. कादंबरीतून विचारांना चालना मिळते. कादंबरीत विश्लेषणाला महत्त्व असते. कादंबरीतून कादंबरीकाराचे व्यक्तित्त्व डोकावते.

कादंबरी हा वाङ:मय प्रकार सर्वसमावेशक आहे. प्रामुख्याने कादंबरीचे कथानक, वातावरण, निवेदन पध्दती, पात्रांचे नियोजन व विकास व भाषाशैली हे घटक महत्वाचे आहेत.

**कथानक :-**

कथा हा कादंबरीचा प्राण आहे. मानवाचा स्वभाव आणि त्याच्या कृती व त्यातून निष्पन्न होणा-या घटना यांची कालक्रमानुसार मांडणी केली की, 'गोष्ट' तयार होते. कथा व कथानक ह्या गोष्टी वेगळयाआहेत.

'कथानक' कादंबरीचा एक घटक किंवा साधन आहे. त्यात जे जे घडलं त्याची रंगतदार हकीकत कार्यकारण मीमांसेने सांगितली जाते.

कथानक म्हणजे विशिष्ट व्यक्तींच्या जीवनात घडलेल्या प्रसंगांची 'चतुराईची गुंफण' होय. गोष्टीत केवळ' काय आहे' हेच ऐकण्यास आपण उत्सुक असतो.

कथानकाला इंगजीत प्लॉट' म्हणतात-कथा व कथानकातील अंतर स्पष्ट करताना फॉस्टर म्हणतो, 'कथेत घटनांची कालक्रमानुसार नोंद असते.'

कथानकातही घटनांचेच वर्णन असते. परंतु त्यात घटनांच्या मागील कार्यकारण भाव मीमांसेलाही अधिक महत्व असते. एखादी घटना घडली एवढेच सांगून लेखकाचे काम पूर्ण होत नाही. तर ती घटना का व कशी घडली हे ही दाखवावे लागते. कथानकात कार्यकार मीमांसा व कुतूहल निर्मिती या दोन गुणांमुळे चित्ताकर्षकता येते. एका प्रसंगातून दुसरा प्रसंग उद्भवला की कुतूहल निर्माण होते. कार्यकरण संबंधामुळे कथानकाला विस्तार व गती मिळते.

'कथा' ही कथानकाचा आधार असते आणि कथेत घटनांचा संग्रह असतो. असे असले तरी कथानक एक उच्च प्रकारची क्रमबध्द योजना आहे. ही योजना कलात्मक असली पाहिजे. कारण कादंबरी ही एक कला आहे. घटनांची संगतवार माहिती सांगणे किंवा त्यांचे वर्णन करणे एवढेच कादंबरीकाराचे काम नसून त्या घटनांची निवड करणे व पुन्हा सुबक मांडणी करणे हे त्याचे कार्य असते, जे तो कथानकाद्वारे साधतो.

कथेतील घटना या सत्याधिष्ठित असतात. कथानकात विश्वसनीयता हीच सत्याची कसोटी आहे. त्यादृष्टीने ॲरिस्टॉटल म्हणतात की, 'कथानकात विश्वास उत्पन्न करण्याचा गुण असला पाहिजे. कादंबरीकार हा एक सिध्द मिथ्यावादी असावा '.

कथेत एका घटनेनंतर दुसरी घटना ऐकण्याची उत्सुकता असते. कथानकाचे कांदबरीतील स्थान फार महत्वाचे आहे.

त्यादृष्टीने 'देवाची साक्ष' या कादंबरीत धरण ग्रस्तांविषयी माहिती आली आहे. जेंव्हा धरण होणार हे समजते व गावातील लोकांना आपले गाव, घर, शेती सर्व ऋणानुबंध सोडून सरकारने दिलेल्या माळावर राहावे लागते, तेंव्हा त्यांना आपल्यायर होणारा हा अन्याय सहन होत नाही. परंतु तरीही आपल्यावर होणा-या अन्यायाविरुध्द ते बंड करु शकत नाहीत. माळावर

जीवन जगत असताना या लोकांना अनेक चांगले-वाईट अनुभव येतात.

' देवाची साक्ष' ही कादंबरी पात्रमुखी आहे. सदा हा आपल्या जीवनात घडलेल्या सर्व घटना सांगतो. समाजात जीवन जगत असताना काहीही गुन्हा नसताना त्यांना अनेक प्रतिष्ठित लोकांचा त्रास सोसावा लागतो.

'देवाची साक्ष' या कादंबरीमध्ये धरणाची वर्णने आली आहेत. नंतर या धरणग्रस्तांना उजाड माळावर कसे राहावे लागते याचे वर्णन आले आहे. कुत्री-कावळे ओरडणे म्हणजे संकटाची अगोदरच सूचना कळते. व आपल्यावर येणा-या संकटाने व्यक्ती घाबरुन जातात.

ज्याप्रमाणे भूकंपाची चाहूल कुत्र्याला लागते तशी माणसांना देखील आपले जीवन उध्वस्त कसे होणार याची जाणीव होते.

' देवाची साक्ष' ही कादंबरी वास्तववादी आहे. तरी या वास्तवाला सुध्दा कल्पनेची जोड दिली आहे. असे वाचकाना कादंबरी वाचताना समजते.

परमेश्वर प्रसन्न झाल्यानंतर माणसांना सर्व काही मिळते परंतु त्या देवाला सुध्दा वैराण माळावर माणसाच्या नशिबाला नशिब बांधून याव लागलं होत. खरच या जीवनात माणसाला अनेक संकटाना तोंड द्यावे लागते. या परमेश्वराच्या समोर जे घडायला नको होते. ते सुध्दा घडले जाते. ही घटनांची गुफंण आहे. व वास्तवाला रंजकता यावी म्हणून कल्पनेचा रंग गडद झाला आहे.

नलगे यांच्या 'देवाची साक्ष' या कादंबरीत मौलिकता हा कथानकाचा गुण दिसून येतो. कारण कथानक हे स्वतंत्र कौशल्यपूर्ण मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मानवाचे जीवन हे विविध प्रकारांनी नटलेले आहे. पावला-गणिक आपल्याला नवीन समस्या व जीवन पाहावयास सापडते. व यावरच 'देवाची साक्ष' यावर स्वतंत्र कथानकाची उभारणी करता येते.

' देवाची साक्ष ' या कादंबरीतील व्यक्ती त्यांच्यावर आलेल्या परिस्थितीमुळे अगतिक झाल्या आहेत. त्यांना आपल्यावर होणा-या अन्यायाला वाचा फोडता येत नाही. ते होत असलेला अन्याय मुकाटपणे सहन करतात. यामध्ये सदाचे बालपणापासूनचे स्वप्न साकार होत नाही.

कारण त्याने आपल्या अंतःकरणात जपून ठेवलेली गोष्ट त्याला मिळत नाही. म्हणून तो अतिशय दुःखी होतो. कादंबरी ही उत्सुकता निर्माण करणारी आहे.

' अगीनफूल' या कादंबरीत चंद्रकुमार नलगे यांनी पतिव्रता स्त्रीचे जीवन रेखाटले आहे. ही सत्यकथा आहे. या कादंबरीमध्ये जेव्हा सावित्राचा नवरा भाना याचा खून होणार याची चाहूल निसर्गातील साप-सापटूल, कोल्ही, लांडगी यांना लागते.

तसेच सावित्राचा चुलत सासरा संभा म्हणजेच भागुजी डोंगरा. हा धनगर आपल्या भावाच्या समाधीवर रोज दिवा लावतो. कारण त्याला आपण आगीतून पळून गेलो व आपल्या भावाला मात्र आपण वाचवू शकलो नाही याचे दुःख वाटते म्हणूनच तो भक्तिभावाने भावाच्या समाधीवर दिवा लावतो. हे प्रसंग चंद्रकुमार नलग्यांनी तयार केल्यामुळे या कादंबरीची गूढ रम्यता वाढवलेली आहे. ज्याला आपण 'रामॅंटिसिझम' म्हणतो तशी ही कादंबरी सौंदर्यवादी आहे याची जाणीव ही कादंबरी वाचताना होते.

माणसाने आपल्या समृध्दीसाठी इतरांची जीवनं उध्वस्त केली. हैबताने स्वतःची वासना पूर्ण करण्यासाठी दुस-याचे जीवन उध्वस्त केले.

जना ही खारोखरच आपले लग्नापूर्वीचे असलेले वेताळा राऊताबरोबरचे अनैतिक संबंध चालू ठेवते. या तिच्या विकृतीने निर्माण झालेले जीवन उध्वस्त झाले आहे. तसेच मानवी विकाराच्या आहारी गेलेला समाज यात दिसून येतो. असे पात्र सर्वच खेडयातून असते असे नाही. तर समाजात संकृत तशीच विकाराच्या आहारी गेलेली माणसं या पात्रातून दिसतात. हे या कथानकाचे सामर्थ्य आहे. कादंबरी म्हणजे रटाळ नसते. तर कादंबरीत गडद रंग आणावे लागतात. म्हणून ही पात्रे योग्य आहेत.

दैवानचं सावित्राचा छळ मांडला होता. नव-यानं टाकली तरी त्याच्या नावाच्या कुंकवावर सावित्रा जगली. कुकंवासाठी जिवाचं रान केलं. जपलं पण तेच काळानं पुसून टाकलं. तिचा सप्तरंगी इंद्रधनू उध्वस्त करुन टाकला. व्यक्तिचित्रणात नायक किंवा नायिका यांचे अनेक पैलू

उत्कट करावे लागतात. पात्राच्या ठिकाणी असलेली उत्कट भावना, धैर्य, नीती मूल्यांची जपणूक करताना घेतलेले परिश्रम हा सावित्राच्या स्वभाव चित्रणाचा उत्कृष्ट नमुना होय.

सावित्रा ही आपल्या सासू नणंदेविरुध्द बोलू शकत नाही. पुन्हा हीच सावित्रा वेताळा रावताला मारण्याचा निश्चय करते.

ही कादंबरी वाचकाच्या मनावर कायम रहाते.

या कादंबरीत वाचकाला सतत पुढे काय घडणार याची उत्सुकता, ओढ लागलेली असते.

कादंबरीमध्ये आरंभ, मध्य आणि शेवट हे तीन भाग महत्वाचे असतात आणि त्यांचाही विचार करणे आवश्यक ठरते.

**कादंबरीचा आरंभ :-**

'देवाची साक्ष' या कादंबरीतील मध्यवर्ती विचार तसेच भावना या पुढे ठेवून आरंभ केला आहे. माणसांच्या नशिबात किती प्रसंगाना तोंड द्यावे लागते. आपली मुलगी मृत्यू पावली असताना भूक लागली म्हणणारा कुशीचा बाप खरोखरच क्रूर नाही. परंतु त्याला परिस्थितीने तसे बनवले आहे.

'अगीनफूल' या कादंबरीतील नायिका सावित्राला सासू व नणंद यांच्या मुळे माहेरी यावे लागते. तेव्हा सोडचिठ्ठी घेण्याचा वडील हट्ट धरतात, पण सावित्रा या गोष्टीला नकार देते. कारण ती पतिनिष्ठ आहे. या कादंबरीतील कथानकाचा आरंभ हा कथेतील मध्यवर्ती विचार व भावना स्पष्ट करणारा आहे. सावित्रा म्हणते, 'एकदा पतीच्या नावाने जो कुंकवाचा टिळा लावला तो आता सरणावरच जळेल'.

**कादंबरीचा मध्य :**

'देवाची साक्ष'. चंद्रकुमार नलगे यांच्या या कादंबरीत वाचकांना, वाचत असताना पुढे काय घडणार याची उत्सुकता निर्माण होते. माळावर बांधलेलं तुळजेच देऊळ हे देऊळ वाटत नाही. देवळातील तुळजा तुळजाच वाटत नव्हती. तसेच परिस्थितीमुळे माणसाचा स्वभाव कसा बदलतो याचे चित्रण आले आहे.

नलगे यांनी 'अगीनफूल' या कादंबरीचा मध्य वाचकांच्या मनाची पकड घेणारा केला आहे. वाचक कादंबरी वाचत असताना त्यांना आता पुढे काय होणार हे ऐकण्यासाठी उत्कंठा लागलेली असते.

सावित्राच्या पतीचा खून झाला ही बातमी घेऊन रामूबाबा येतात. परंतु त्यांना ही बातमी कशी सांगावी हेच समजत नव्हते. परंतु धाडस करुन खुनाची बातमी सांगितली जाते. हे सर्व ऐकून सावित्रा कुणाला ही न घाबरणारी धाडकन जमीनीवर कोसळते, मुकी होते. कारण तिचा कुंकवाचा आधारही नाहीसा झाला होता.

**कादंबरीचा शेवट :-**

कथानकाचा शेवट हा विषयानुरुप व स्वाभाविक असावा. ' देवाची साक्ष' या कादबरीत सदाच्या नशिबी बालपणापासून दु:ख आलेले असते. परंतु त्याने आपल्या मनात कोरलेली वैजू त्याला दिलासा देते. जेव्हा सदाला वैजू मिळत नाही. फक्त वैजूनं काढलेली तुकडया तुकडयांची सरस्वती राहिलेली असते. नलगे यांनी कादंबरीचा शेवट विषयानुरुप केला आहे.

' अगीन फुल या कादंबरीतील एका स्त्रीने, सावित्राने वेताळा राऊताचा खून करण्याचा निश्चय केलेला असतो. वेताळा राऊताच्या बाजूने जरी निकाल लागला होता तरी सावित्रानं मात्र त्याचा बदला घेतला. व वेताळा राऊत रक्ताच्या थारोळयात पडलेला पाहून सावित्राची ईर्षा संपली. आता तर सावित्रा खरोखर विधवा झाली होती.

या कादंबरीचा शेवट नलगे यांनी शोकपर्यवसायी केला आहे. त्यामुळे ही कादंबरी वाचकांच्या मनावर पूर्णपणे बिंबीत होते. तसेच नलगे यांनी कथानकाचा शेवट हा विषयानुरुप केला आहे.

**वातावरण :-**

'देवाची साक्ष' या कादंबरीतील समाज जीवन पाहात असताना समाजातील अनेक स्तरातील लोकांचा विचार केलेला दिसतो. तसेच परिस्थितीने अगतिक झालेले लोक, विकारी लोक यांचाही विचार केला जातो. विशा, शि-या, नु-या व सदा हे बालपणी स्वप्ने रंगवत पण या स्वप्नांचा

नाश झाला होता. हे मित्र नंतर परिस्थितीमुळे वेगळे होतात.

या कादंबरीत धरणग्रस्तांचे जीवन लेखकाने रेखाटले आहे. तसेच उपासमारीचे भयानक चित्र व देवाच्या साक्षीत घडलेले नको ते प्रकार यात दिसून येतात. सलमा ही विकारी स्त्री आहे. तसेच काही व्यक्ती या एकमेकांना मदत करतात. तर माळावर राहिला आल्यानंतर समाजातील उच्चभ्रू वर्ग त्यांच्यावर अनेक आरोप घेतात व त्यांनी आपला गांव सोडावा म्हणून त्यांना त्रास देतात. या कादंबरीत उध्वस्त झालेल्या समाजाचे चित्रण करुण झाले आहे. या कादंबरीतील व्यक्ती आपल्यावर होत असलेला अन्याय अगतिकपणे सहन करतात. यातील लोक हे अज्ञानी व लाचार आहेत.

' अग्नीनफूल' या कादंबरीतील समाज जीवनाचे चित्र रेखाटताना स्त्री ही खारोखारच किती सहनशील, सोशिक असते. व प्रसंगी हीच स्त्री रणमर्दानी होऊ शकते, हे पाहावयास मिळते. तसेच या समाजातील लोक हे सतत वैराच्या भावनेने एकत्र आलेले दिसतात. यातील स्त्री हीच सावित्राचा छळ करते तरी देखील पतिनिष्ठ सावित्रा आपल्या नशिबाला दोष देते. ती आपल्या सासू व नणंदेवर राग धरत नाही. समाज हा किती हीन पातळीचा आहे हे या कादंबरीत दिसून येते. कारण जना ही स्वत:चे लग्न झाल्यावर देखील पूर्वीचे संबंध तसेच चालू ठेवते.

अज्ञानी अशा व्यक्तीमुळे समाजात अनेक वाईट विचारांना चालना मिळते. त्याचप्रमाणे सावित्रा ही पतिव्रता स्त्री आहे. ती आपल्या पतीच्या नावानेच कुंकू लावण्यात समाधान मानते. सावित्रा आपल्या पतीला परमेश्वर मानते. पतीला कोणी वाईट बोललेलं सावित्राला आवडत नाही. ती त्यांच्यावर रागावते.

वेताळा राऊत हा तर भानाला अफरातफरीच्या गुन्हयास कारणीभूत ठरवतो. हा वेताळा राऊत समाजाला लागलेली एक किड आहे. हा अनेक निष्पाप मुलीवर बलात्कार करुन आपली वासना भागवत असतो.

या कादंबरीतील स्त्री ही अन्याय सहन करते. परंतु त्याची मर्यादा संपल्यानंतर मात्र ती बंड करुन उठते. वेताळा राऊताचा खून करण्याचा निश्चय सावित्रा करते. यावरुन तिचा करारी व

मानी स्वभाव दिसून येतो. 'अगीनफूल' या कांदबरीत सावित्राचे आई-वडील आपल्या मुलीच्या दु:खाने क्षीण होतात.

'अगीनफूल' या कांदबरीत अनेक बुरसटलेल्या विचाराच्या व्यक्ती दिसून येतात. सावित्राची सासू ही आपल्या सुनेवर करणी केल्याचा आरोप करते. व या कारणावरून सावित्रीला घराबाहेर काढते. तसेच सावित्रा जनाशी बोलते. हे देखील सासूला आवडत नाही.

काही व्यक्ती या वेळ प्रसंगी उपयोगी पडतात. सावित्राची मैत्रिण मंगला ही आपल्याला संकट दिसत असताना जीव धोक्यात घालते. सावित्रा ही आपल्यावर झालेला अन्याय सहन करत असताना रतन पाटील सारख्या त्याला घाबरत नाही. त्याच्यापुढे सुध्दा सावित्रा ताठ मानेने उभी राहते. हा रतन पाटील गोर-गरिबांचं उभ पीक कापी, दुकानदाराच्या बायकोपुढं बळ बघून उभा राही. खांडणी मागी-याला लोक घाबरत. पण त्याला देखील सावित्राने आव्हान केले.

या कांदब-यातील समर प्रसंगांचा विचार, करता असे दिसून येते की, देवाची साक्ष, या कांदबरीत मानवी संबंधाचे दर्शन घडवताना अनेक व्यक्ती पाहवयास मिळतात. मानवी जीवन हा एक रणसंग्राम आहे. माणसाला परिस्थितीशी निसर्ग व समाजाशी व स्वत:च्या मनाशी झगडा घ्यावा लागतो. मानव हा अनेक बंधनानी बांधलेला आहे. नानावर आपल्या कुटुंबाची जबाबदारी आहे. या कांदबरीत अनेक पात्रांना परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागते. आपले गाव सोडून जावे लागते तेव्हा देखील त्यांना अनेक संकटाना तोंड द्यावे लागते. समाजातील सर्व स्तरातील लोकांचा परिचय होतो. त्यांच्या वागण्याच्या पध्दती समजतात. तसेच तुका आबा सारखा वारकारी इतरांना मदत करतो देवाच्या समोर नको ते करणा-या व्यक्ती देखील 'देवाची साक्ष' या कांदबरीत आढळतात.

सदाला तर बालपणापासून परिस्थितीशी झगडावे लागते, त्याने आपल्या मनात कोरलेली वैजूची मूर्ती सुध्दा त्याला मिळत नाही. या कांदबरीत काळा चष्मा म्हणजे दगड खाण मालक हा वासना विकारी आहे. तो आपल्या खाणीवर काम करण्यास असणा-या स्त्रियांना जास्त पैसे देतो व त्यांच्याकडून आपली वासना पूर्ण करतो. सलमा ही नखरेल पोर त्याच्या वासनेस बळी पडते.

'अगीनफूल' या कांदबरीत सावित्रा ही आपल्या पतीसाठी कोणतेही दिव्य करण्यास

तयार असते. सावित्रा ही खरोखरच कोणावर राग धरत नाही. ती आपल्या नशिबाला दोष देते. सावित्रा ही मानी, कर्तबगार आहे. ती परिस्थितीशी सामोरे जाते. तिच्यावर आलेल्या अनेक संकटाना ती हसत हसत तोंड देते. सावित्रा माहेरी आल्यानंतर देखील आपला भार वडलांवर पडू नये म्हणून शेतीचा सर्व कारभार पाहाते.

सासू व नणंद या अंधश्रध्दाळू आहेत. भाना हा सावित्राचा नवरा. मनाने साधा सरळ वृत्तीचा आहे. तो आपल्या पत्नीवर प्रेम करतो. पण तसे बोलून दाखवत नाही. वेताळा राऊत हा या कादंबरीतील खलनायक. या वेताळा राऊताला मारण्याचा निश्चय सावित्रा करते.

'देवाची साक्ष' या कांदबरीमध्ये धरणग्रस्त व प्रतिष्ठित लोकांमध्ये संघर्ष दिसून येतो. हे प्रतिष्ठित श्रीमंत लोक आपल्या संपत्तीच्या जोरावर माळावर राहणा-या निष्पाप स्त्रियांचा वासना पूर्ण करण्यासाठी उपयोग करतात, तसेच गावातील उच्चभू लोकांच्या सांगण्यावरुन गुन्हा केला नसताना या धरणग्रस्तांना शिक्षा भोगावी लागते. तरी देखील या कांदबरीतील पात्रे आपल्यावर होणा-या अन्यायाविरुध्द बंड करुन उठत नाहीत. 'अगीनफूल' या कांदबरीत देखील संघर्ष दिसून येतो. यामध्ये तर वैराची गुंतागुंत दिसून येते. सावित्राचा सासरा हा हैबताला सांभाळलो, त्याला पैलवान केले. नंतर हाच हैबता सावित्राच्या सास-याचा भाऊ संभा याच्या बायकोकडे वासनेने पाहतो हे सावित्राच्या सास-यास आवडत नाही. तो हैबताला खूप मारतो. व यातूनच वैराला सुरुवात होते. यांनी एक दिवस कट करुन सावित्राचा सासरा झोपला होता त्या घराला आग लावली.

या हैबताचीच सून जना ही देखील अजून सावित्राचे घर माणसातून उठावे म्हणून अनेक प्रयत्न करते.

तसेच वेताळा राऊत हा भानाचा फसवून खून करतो.

या संघर्षामुळेच मानवामध्ये धैर्य, साहस, सत्य इत्यादी गुणांची कसोटी लागते. म्हणजेच अगीनफूल या कादंबरीत सावित्राच्या ठिकाणी धैर्य, साहस व सत्य या गुणामुळेच ती संघर्ष करण्यास तयार होते. संघर्ष हाच कांदबरीतील कथानकाचा केंद्र बिंदू असतो.

'देवाची साक्ष' या कादंबरीतील वातावरण हे अनेक समस्यांनी भरलेले आहे. व्यक्तीला माळावर ओसाड ठिकाणी राहत असताना अनेक संकटाता तोंड द्यावे लागते. यातून नवीनच समस्या निर्माण होतात. म्हणजेच गुन्हा केलेला नसताना शिक्षा भोगावी लागते.

' अगीनफूल ' या कादंबरीमधील वातावरण हे देखील व्देषाने, वैराने भरलेले आहे. यामधील पात्रे ही एकमेकांकडे व्देष भावनेने पाहतात. अनेक आरोप स्त्रीने स्त्रीवर करताना दिसून येतात. विकाराने भरलेले हे जग व आपली मूल्ये जपणारी ही सावित्रा नायिका आहे.

'देवाची साक्ष' या कादंबरीत सदाचे वडील नाना आपल्या पत्नीवर संशय घेतात व त्यांना सोडून निघून जातात. सदा हा शेवटी वैजू मिळत नाही म्हणून दु:खी होतो. तसेच या कादबरीतील मूल्यांचा संघर्ष पाहताना असे चित्र दिसून येते की, प्रत्येक व्यक्ती आपला दर्जा टिकवण्यासाठी संघर्ष करत आहे. तसेच चंदू मोकाशी, सलमा यांच्यासारखी व्यक्ती या विकाराच्या आहारी जातात. या कांदबरीत राहणा-या व्यक्ती या सांस्कृतीक सण, उत्सव देखील साजरे करु शकत नाहीत.

ज्या स्त्रीया वाघाला कोयत्याने मारीत. त्यांचे देखील हात परिस्थितीने जखाडून टाकले होते.

'अगीनफूल' या कादंबरीत सावित्रा ही आपल्या पतीवर फार प्रेम करते. ती आपल्या पतीसाठी सर्व काही सहन करते. पण जेव्हा तिला कळते की आपल्या पतीचा खून झाला आहे तेव्हा ती खूप दु:खी होते.

**निवेदन पध्दती :-**

' देवाचीसाक्ष' या कादंबरीत सदा आपल्या जीवनात कोणकोणत्या चांगल्या वाईट घटना घडल्या आहेत याचे निवेदन करतो. देवाच्या समोर ज्या गोष्टी घडू नयेत. त्या देखील घडतात. प्रत्येक माणसाला जे हवे ते मिळतेच असे नाही. तसेच सदाला देखील जे हवे ते मिळाले नाही. गावातील लोकांनी धरण होऊ नये म्हणून खूप प्रयत्न केले. रक्त सांडण्याची भाषा लोक बोलू लागले.

' अगीनफूल' या कादंबरीमध्ये सावित्रा ही आपल्या जीवनातील सर्व बारीकसारीक घटना सांगते. सावित्रा आपल्या सासू नणंदेविषयी आई वडिलांना काही सांगत नाही. सावित्राला आजगी खूप गोष्टी सांगायची. सावित्रा आपल्या पतीच्या खूनाचा सूड घेण्याचे ठरवते.

चरे माळेशीला जाणारी तांबडीशी पाऊलवाट पिकांच्या झाडीच्या गदीतून ती जाणारी चिमुकली वाट. फळा-फुलांच्या मोसमात एक वेगळा गंध घेऊन उभी असायची.

कोकणात उंच डोंगर, खोल द-या, निळे आभाळ सांज सावल्या समोर येत. मने वानरांच्या संगे झाडाझाडावर उडया मारी. हुप्पहुप्प करुन वानर बने. लालगरद उंबरावरचा पोपटाचा थवा निळ्या आभाळात उडे. कोकणात आंब्या फणसाच्या हंगामात तर कोणी पण येऊन रामनेवा लुटून न्यावा असे वाटे.

' अगीनफूल' या कादंबरीमध्ये ज्या भागाच्या पार्श्वभूमीवर ही कादबरी उभी आहे. त्या भागातील निसर्गाचे बारकावे व प्रादेशिक वातावरण डोळयापुढे उभे राहाते.

' पांद अरुंद, दोन्ही बाजूला घाणेरीचं तटच्या तट, उंच उंच वाढलेलं काटयाकुटयांनी भरलेलं गचपन नुसतं एकटयाला भीती वाटावी अशी पांद'.

'बाभळाचं झुडुप - थोडसं थोराड काटेरी हिरवळच. पानानं गजबजलेलं. विहिरीच्या काठावर उगवलेलं पण विहिरीवर जाऊन आत झुकलेलं'.

श्रावण-एक सोनेरी सांयकाळ-झरणारे तुषार ..... कोवळं ऊन ऊनपावसाचा खेळ ........ उन्हसावल्याची पाठशिवण ..... रंग बिलोरी ..... हे दृष्य सावित्रा पाहात होती. तेवढयात एक स्पष्ट रंगाचा इंद्रधनुष्य आकाराला आला. त्याचं एक टोक तिच्या अंगणात होतं अन् दुसरं लांब कुठतरी. निळया आकाशात शिरल्यासारखा कुठं उतरलं होतं ते दिसतच नव्हत. सावित्राला वाटे ही देवाच्या घरची वाट असेल.

**पात्रांचे नियोजन व विकास -**

कथानकातील पात्रे प्रसंगात प्रभाव दाखवितात. हे प्रसंग सारे कथानक घडवितात.

चंद्रकुमार नलगे यांच्या कादंबरीतील पात्रांचे विश्व विस्तृत आहे.

'देवाची साक्ष' या कादंबरीत अनेक स्वभावाची पात्रे दिसून येतात. त्यांच्या वागण्याच्या पध्दती या वेगळया त-हेच्या दिसतात. तसेच कधी कधी चांगल्या व्यक्ती देखील किती हीन पातळीवर जातात याचे चित्रण आले आहे.

परिस्थितीने दुर्गणाच्या आहारी जाणारी पात्रे आपली सुटका करुन घेतात. यामध्ये सदाची आई ही काकाचा आधार घेते पण विकाराच्या आहारी जात नाही. हा या पात्राचा विकास होय. सदा देखील कोणतेच वाईट विचार करत नाही तो स्वतःचा विकास घडवतो.

तसेच समाजात अनेक विकृत मनाची पात्रे दिसून येतात. चंदू मोकाशी सारखी दुर्वर्तनी पात्रे आहेत. सलमा ही आपल्या तारुण्याचा गैरवापर करते. त्याचप्रमाणे काळा चष्मेवाला खाण मालक हा आपल्या जवळ असलेल्या श्रीमंतीचा गैरवापर करतो.

सदाचे वडील नाना एक बंडखोर चिडके, रागीट असे व्यक्तिमत्व त्यांच्यात दिसून येते.

वैजू ही सदाच्या मनात कायम कोरलेली मूर्ती होय.

'अगीन फूल' कादंबरीत सावित्रा ही सर्वश्रेष्ठ मूल्य असणारी आहे. सावित्राची सासू व नणंद यांच्या स्वभावात सुनेला छळण्याची वृती दिसून येते. कोणत्या तरी कारणावरुन सावित्राला या त्रास देत असत. सावित्राची सासू अंधश्रध्दाळू आहे.

सावित्राचा पती भाना. हा साधासरळ स्वभावाचा. त्याला आई व बहीणीविषयी खूप प्रेम आहे. म्हणूनच तो आपल्या बायकोबर प्रेम असून सुध्दा बोलून दाखवत नाही. हे दुःख नियतीन प्राप्त झालेलं नाही, तर माणसांच्या दुष्ट प्रवृत्तीने प्राप्त झालेलं हे दुःख आहे.

**भाषाशैली :-**

पात्रनुरुप नलगे भाषा अधुनमधून वापरतात. ग्रामीण भाषा ही नलगे यांच्या कादंबरीत आढळते.

' देवाची साक्ष ' या कादंबरीत ग्रामीण शब्द - बुटटी, पल्याड इत्यादी. वाक्प्रचार - तुफान माजवणे, कपाळमोक्ष होणे,

मनाचा ठाव घेणे, जीव मुठीत धरणे,

स्वर्ग हाताशी येणे , कालवाकालव होणे,

व्यग्र होणे, थैमान घालणे, मात करणे इत्यादी.

नलगे यांनी 'देवाची साक्ष' या कादंबरीत ग्रामीण भाषेचा वापर केलेला आहे. त्याचप्रमाणे.

' अगीनफुल ' या कादंबरीत पात्राची भाषाही ग्रामीण आहे.

उदा. ' सांज अंगणात उतरायला लागलय नि तुमी आसं यावेळला गप्प का झालायसा ।'

'कंटाळा आलाना बसलूय आपला सजागती' त्याचप्रमाणे ग्रामीण शब्द आलेले आहेत.

उदा. न्यार, नेट, भपकारं, चौसोपा, पांढुरक्या, उमती, अमजल, सोकून, इत्यादी, तसेच काही वाकप्रचार आले आहेत. उदा. पोटात घस्स होणे, सार्थक होणे, मान डोलावणे, जमीनदोस्त करणे, हिरावून घेणे, वसा होणे, वंचित होणे, भान हरपून जाणे इत्यादी.

त्याप्रमाणे म्हणी आलेल्या आहेस - उदा. वडयांचं तेल वांग्यावर. प्रा. नलग्यांची कथनात्मक भाषाशैली अत्यंत परिणामकारक आहे. कादंबरीतील भाषेला काव्यात्मक लय प्राप्त झाली आहे. प्रसंग, बारकावे ते खुबीने टिपतात. लेखक ग्रामीण भागाशी समरस झाल्यामुळेच हे शक्य झाले आहे. प्रसंगाचे वर्णन जसेच्या तसे उभं करण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत आहे.

वारणा खो-यातील भाषा, तिथल्या चालीरीती या कादंबरीत ठळकपणे आढळतात. अशाप्रकारे प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या देवाची साक्ष आणि अगीन फूल या कादबरीचे रचनात्मक दृष्टया, संबधात्मक समीक्षण करण्यात आले आहे.

XXXXXX